महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या (NRLM-Intensive) प्रभावी अंमलबजावणीसाठी विस्तारीत संस्थीय संरचना निर्माण करणे.

## महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः मजिअ-२०१३/प्र. क्र. १४३/योजना-३

बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई

तारीख: २१ मे २०१३

वाचा -

१) शासन निर्णय क्रमांकः एनआरएलएम-२०११/प्र.क्र.१९६/योजना -३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक १८/०७/२०११

२) शासन निर्णय क्रमांकः एनआरएलएम-२०१२/प्र.क्र.४२/योजना -३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक ३१/०३/२०१२

३) शासन निर्णय क्रमांकः एनआरएलएम-२०१२/प्र.क्र.१७७/योजना -३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक ३/१०/२०१२

४) शासन निर्णय क्रमांकः एमएसआरएलएम-२०१२/प्र.क्र.२८१/योजना-३ ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक १५/१२/२०१२

प्रस्तावना -

ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मुलनासाठी स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेत बदल करुन मागणी आधारित धोरणानुसार सन २०११ पासून केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची सुरुवात केली आहे. महाराष्ट्र राज्यात ग्रामीण भागातील दारिद्रय निर्मुलनासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची स्थापना करण्यात आली असून या अभियानाची अंमलबजावणी प्रथम टप्प्यात राज्यातील १० जिल्हयांमधील ३६ तालुक्यांमध्ये Intensive पध्दतीने व उर्वरित सर्व तालुक्यांमध्ये Non-Intensive पध्दतीने करण्यात येत आहे. भविष्यात टप्प्या - टप्प्याने सर्व Non-Intensive तालुक्यांचे रुपांतर Intensive तालुक्यांमध्ये केले जाणार आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यंत समर्पित, स्वतंत्र व कुशल मनुष्यबळाची उभारणी करण्याची तरतुद केली आहे.

प्रस्तावित प्रथम टप्प्यातील १० जिल्हयातील ३६ तालुक्यांमध्ये Intensive पदध्दतीने राबविण्यात येणाऱ्या अभियानाच्या अंमलबजावणीची व्याप्ती लक्षात घेता संदर्भिय शासन निर्णय क्रमांक

१ अन्वये मंजूर केलेल्या मनुष्यबळाचा विस्तार करुन राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानासाठी सुधारीत संस्थीय संरचना निर्माण करुन मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत कार्याची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र, समर्पित आणि संवेदनशील यंत्रणा निर्माण करण्याच्या दृष्टीने संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांसाठी काही पदे प्राथमिक स्वरुपात मंजूर करण्यात आली होती. अभियानाची वाढती व्याप्ती लक्षात घेता अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही जादा पदांची आवश्यकता निर्माण झाल्याने राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष व प्रथम टप्यात निवडण्यात आलेल्या १० जिल्ह्ये आणि ३६ तालुक्यांसाठी परिशिष्ट क्रमांक १ मध्ये दर्शविल्याप्रमाणे विस्तारीत संस्थीय संरचनेस शासन मान्यता देत असून वरील आराखडयातील मंजूर पदांच्या सर्वस्तरावरील नियुक्त्या करण्यास शासन मंजूरी देत आहे.

**राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष**

अभियानाच्या प्रभावी अमंलवजावणीसाठी राज्यस्तरावर राज्य मिशन व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून अभियानासाठी नियमित सुलभिकरण व सनियंत्रण अशा व्यापक स्वरुपाची कामे या कक्षामार्फ़त करण्यात येणार आहेत. त्यामुळे कामाची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन परिशिष्ट क्रमांक २ नुसार सुधारीत संस्थीय संरचनेस मान्यता देण्यात येत आहे. या बाबतीत संदर्भ क्रमांक १ अन्वये निर्माण करण्यात आलेल्या राज्य अभियान व्यवस्थापन कक्षातील पदांची भरती, नियुक्तीचा प्रकार व अर्हता निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, अभियान यांना असतील.

**जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष / तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष**

अभियानातंर्गत पहिल्या टप्प्यात निवडलेले ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, नंदूरबार, यवतमाळ, वर्धा, गोंदिया व गडचिरोली या जिल्ह्यांसाठी जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व या जिल्ह्यांतर्गत निवडलेल्या ३६ तालुक्यांमध्ये तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाची संदर्भ क्रमांक २ अन्वये निर्मिती करण्यात आली आहे. जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाकडे अभियानासाठी दैनंदिन सुलभीकरण, अंमलबजावणी आणि सनियंत्रण अशा मुख्य जबाबदाऱ्या आहेत. या कक्षात वाढीव मनुष्यबळाची गरज लक्षात घेऊन परिशिष्ट क्रमांक ३ मधील जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष व परिशिष्ट क्रमांक ४ मधील तालुका अभियान व्यवस्थापन कक्षाकरीता सुधारीत संस्थीय संरचनेस मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातंर्गत परिशिष्ट क्रमांक १ मधील जिल्हा व तालुका अभियान कक्ष आणि त्याखालील अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करण्यासाठी संदर्भ क्रमांक १ व २ मधील अर्हता, कामाचा अनुभव व कर्तव्ये आणि जबाबदाऱ्यामध्ये आवश्यकतेप्रमाणे बदल करणे, तसेच नव्याने निर्माण करण्यात येणाऱ्या पदांच्या निवडीसाठी अर्हता, कामाचा अनुभव व कर्तव्ये आणि

जबाबदाऱ्या निश्चित करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना या शासन निर्णयाव्दारे प्रदान करण्यात येत आहेत.

शासन निर्णय संदर्भ क्रमांक १ व २ मधील वेतन, मानधन, भत्ते अधिक्रमीत करण्यात येत असून परिशिष्ट क्रमांक १ मधील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मानधन व भत्ते देण्यासाठी अभियांनातर्गत नियुक्त केलेल्या मनुष्यबळ संसाधन संस्थेच्या (Human Resource Agency) मार्फत देशातील विविध प्रकल्प, अभियान, संस्था इत्यांदीमधील Compensation and Benefits सर्व्हेक्षण करुन संदर्भ क्रमांक ४ अन्वये कार्यकारी समितीच्या मान्यतेने विविध स्तरावरील अधिकारी, कर्मचाऱ्यांचे वेतन, मानधन व भत्ते निश्चित करण्यात येतील. अभियानातंर्गत प्रतिनियुक्तीने व कंत्राटी पध्दतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, मानधन, भत्ते व इतर अनुषांगिक खर्च हा अभियानासाठी उपलब्ध होणाऱ्या निधीतून भागविण्यात येईल.नवीन वेतन, मानधन व भत्ते कार्यकारी समितीमार्फत निश्चित होईपर्यत प्रचलित पध्दतीने वेतन, मानधन व भत्ते अदा करण्यात येतील.

<u>निवड पध्दती व प्रकिया</u>

अभियानातंर्गत परिशिष्ट क्रमांक १ मधील पदे उपलब्धतेनुसार शासकीय, निमशासकीय, बॅकींग इत्यादी क्षेत्रातून उपलब्धतेनुसार प्रतिनियुक्तीने तसेच खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने भरण्यात येतील. वरील दोन्ही स्त्रोतातून उपलब्ध होणाऱ्या मनुष्यबळ संसाधन संस्था (Human Resource Agency) यांच्या सहाय्याने स्पर्धात्मक पध्दतीने निवड प्रकिया घेतली जाईल. कंत्राटी पध्दतीने भरण्यात येणारी पदे अभियानासाठी तज्ज्ञ म्हणून काम करतील. ही पदे शासनाच्या कोणत्याही श्रेणीतील किंवा संवर्गातील पदे नाहीत. ही सर्व पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर भरण्यात येत असल्यामुळे ते कधीच कोणत्याही नियमित शासकिय पदांवर हक्कदार राहणार नाहीत. नियुक्तीपूर्वी तसा करारनामा करण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५२११३०८५३६७२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gite Naresh Bhagwanrao

Digitally signed by Gite Naresh Bhagwanrao
DN: CN = Gite Naresh Bhagwanrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2013.06.19 18:49:26 +05'30'

(डॉ.नरेश गिते)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,

२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव,
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव,
५. अ.मु.सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/आदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/सहकार/कृषि व पदुम/उद्योग, उर्जा व कामगार/आरोग्य/शालेय शिक्षण/उच्च व तंत्र शिक्षण/ रोजगार व स्वयंरोजगार, मंत्रालय, मुंबई.
६. महासंचालक, राजमाता जिजाऊ माता बाल आरोग्य व पोषण मिशन,संचालक (NRHM)
७. महालेखापाल (लेखा परिक्षा), मुंबई/ नागपूर (५ प्रतींसह)
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर (५ प्रतीं सह)
९. सर्व विभागीय आयुक्त
१०. मुख्य कार्यकारी अधिकारी, MSRLM
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. व्यस्थापकीय संचालक, महिला अर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा (प.), मुंबई.
१३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. सर्व उप आयुक्त (आस्थापना/विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,
१५. सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
१६. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व),
१७. संचालक युनिसेफ/SIRD, पुणे,
१८. जनरल मॅनेजर व निमंत्रक, राज्य अग्रणी बँक, बँक ऑफ महाराष्ट्र, पुणे,
१९. अध्यक्ष, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई,
२०. निवडनस्ती.

परिशिष्ट क्रमांक - ०१

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - विस्तारीत संस्थीय संरचना

(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)

### राज्य अभियान व्यवस्थापन कक्षाची संस्थीय संरचना
(Organisational Structure of Mission Management Unit (SMMU))

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**Chief Executive Officer (CEO)**
→ स्वीय सहाय्यक/लघुलेखक १

**अतिरिक्त संचालक तथा**
**मुख्य परिचालन अधिकारी**
**Additional Director & Chief Operating Officer**
→ स्वीय सहाय्यक/लघुलेखक १

**थिमॅटिक सहाय्य शाखा (Thematic Support Unit)**
- कृतीसंगम कक्ष (Convergence Cell)
- नॉन-इंन्टेनसिव्ह कक्ष (Non Intensive Cell)
- क्षमता बांधणी कक्ष (Capacity building Cell)
- आर्थिक समावेशन कक्ष (Financial Inclusion Cell)
- सामाजिक समावेशन, संस्थीय बांधणी, व लिंगभाव कक्ष (Social Inclusion, Institution Building, & Gender Cell)
- उपजिवीका कक्ष (Livelihoods Cell)
- रोजगार व कौशल्य विकास (Jobs Placement and skill development)

**तांत्रिक सहाय्य शाखा (Technical Support Unit)**
- मनुष्यबळ संसाधन व्यवस्थापन कक्ष (Human Resource Management Cell)
- संपादणूक कक्ष (Procurement Cell)
- ज्ञान व्यवस्थापन कक्ष (Knowledge Management Cell)
- सामाजिक निरिक्षण कक्ष (Social observatory Cell)
- माहिती, संवाद व तंत्रज्ञान कक्ष (Information Communication

**प्रकल्प व्यवस्थापन शाखा (Project Management Unit)**
- प्रशासन कक्ष (Administration Cell)
- नियामक व उत्तरदायीत्त्व कक्ष (Governance & Accountability cell)

**लेखा व वित्त व्यवस्थापान शाखा (Accounts & Finance Management Unit)**
- लेखा व्यवस्थापन कक्ष (Accounts Management Cell)
- वित्त व्यवस्थापन कक्ष (Finance Management Cell)


**सुलभकर्ता शाखा (Support Unit)**

युवा विकास व्यावसायिक (Young Development Professional) (२०)

परिशिष्ट क्रमांक - ०१


## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - विस्तारीत संस्थीय संरचना

(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - विस्तारीत संस्थीय संरचना


(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)



परिशिष्ट क्रमांक - ०१

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - विस्तारीत संस्थीय संरचना


(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)



परिशिष्ट क्रमांक - ०१

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - विस्तारीत संस्थीय संरचना


(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)



परिशिष्ट क्रमांक - ०१

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान - विस्तारीत संस्थीय संरचना

**(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)**



परिशिष्ट क्रमांक - ०२

(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र.१४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)

## राज्यस्तर

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | राज्य अभियान महासंचालक तथा सचिव ग्रामविकास | ०१ | संदर्भ शासन निर्णय १ अन्वये पदसिध्द |

## राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी | ०१ | भारतीय प्रशासन सेवेतील मुख्य कार्यकारी अधिकारी/ जिल्हाधिकारी म्हणून काम केलेले जेष्ठ अधिकारी प्रतिनियुक्तीने |
| २. | अतिरिक्त संचालक तथा मुख्य परिचालन अधिकारी | ०१ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अथवा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा स्यात्तकोत्तर पदवी धारण करणारे, त्यांनी दरिद्रय निर्मूलन क्षेत्रात किमान ५ वर्ष काम केलेले अधिकारी प्रतिनियुक्तीने |
| ३. | स्वीय सहाय्यक / लघुलेखक | ०२ | प्रतिनियुक्ती / कंत्राटी पध्दतीने |
| | एकूण पदे | ०४ | |
| I) थिमॅटिक सहाय्य शाखा (Thematic Support Unit) | | | |
| अ) | कृतीसंगम कक्ष (Convergence Cell) | | |
| १. | उपसंचालक - कृतीसंगम | ०१ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरील जेष्ठ अधिकारी किंवा राष्ट्रीयकृत बॅकक्षेत्रातील किंवा स्यात्तकोत्तर पदवी धारण करणारे, त्यानी दारिद्रय निर्मूलन क्षेत्रात किमान ५ वर्ष काम केलेले अधिकारी प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने |
| २. | अभियान व्यवस्थापक - कृतीसंगम | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ३. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ब) | नॉन इन्टेनसिव्ह कक्ष (Non Intensive Cell) | | |
| ४. | उपसंचालक -नॉन इन्टेनसिव्ह | ०१ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी या पदावरील जेष्ठ अधिकारी किंवा राष्ट्रीयकृत बॅकक्षेत्रातील किंवा स्यात्तकोत्तर पदवी धारण करणारे, त्यानी दारिद्रय निर्मूलन क्षेत्रात किमान ५ वर्ष काम केलेले अधिकारी प्रतिनियुक्तीने अथवा खुल्या बाजारातून कंत्राटी पध्दतीने |
| ५. | अभियान व्यवस्थापक - समुदाय संघटन | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ६. | अभियान व्यवस्थापक - क्षमता बांधणी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ७. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| क) | क्षमता बांधणी कक्ष (Capacity Building Cell) | | |
| ८. | राज्य अभियान व्यवस्थापक - क्षमता बांधणी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ९. | अभियान व्यवस्थापक - प्रशिक्षण | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १०. | अभियान व्यवस्थापक - क्षमता बांधणी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ११. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ड) | आर्थिक समावेशन कक्ष (Financial Inclusion Cell) | | |
| १२. | राज्य अभियान व्यवस्थापक - आर्थिक समावेशन (Financial Inclusion) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १३. | अभियान व्यवस्थापक आर्थिक समावेशन (Financial Inclusion) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १४. | अभियान व्यवस्थापक - प्रोडक्ट व सेवा (Product & Services) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १५. | अभियान व्यवस्थापक - विमा (Insurance) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १६. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| इ) | सामाजिक समावेशन, संस्थीय बांधणी व लिंगभाव कक्ष (Social Inclusion, Institution Building & Gender Cell) | | |
| १७. | राज्य अभियान व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | अभियान व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १९. | अभियान व्यवस्थापक - लिंगभाव | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २० | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ई) | **उपजीविका कक्ष (Livelihoods Cell)** | | |
| २१. | राज्य अभियान व्यवस्थापक -उपजीवीका (Livelihoods) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २२. | अभियान व्यवस्थापक -कृषी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २३. | अभियान व्यवस्थापक बिगर शेती | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २४ | अभियान व्यवस्थापक-विपणन व ब्रॅन्डींग (Marketing & Branding) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २५ | अभियान व्यवस्थापक - नाविण्यता (Innovation) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २६ | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| उ) | **रोजगार व कौशल्य विकास कक्ष (Job Placement & Skill Development Cell)** | | |
| २७ | राज्य अभियान व्यवस्थापक - रोजगार व कौशल्य विकास (Job Placement & Skill Development) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २८ | अभियान व्यवस्थापक- रोजगार (Job Placement) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २९ | अभियान व्यवस्थापक- आरएसईटीआय (R-SETI) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ३० | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| | **एकूण पदे** | **३०** | |
| **II)** | **तांत्रिक सहाय्य शाखा (Technical Support Unit)** | | |
| अ) | **मनुष्यबळ संसाधन व्यवस्थापन कक्ष (Human Resource Management Cell)** | | |
| १. | राज्य अभियान व्यवस्थापक - मनुष्यबळ संसाधन व्यवस्थापन | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २. | अभियान व्यवस्थापक - सेवाप्रवेश (Recruitment) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ३. | अभियान व्यवस्थापक - प्रशिक्षण (Training) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ४. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ब) | **संपादणूक कक्ष (Procurement Cell)** | | |
| ५. | राज्य अभियान व्यवस्थापक - संपादणूक (Procurement) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ६. | अभियान व्यवस्थापक - संपादणूक (Procurement) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ७. | संपादणूक सहाय्यक (Procurement Assistant) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| क) | **ज्ञान व्यवस्थापन कक्ष (Knowledge Management Cell)** | | |
| ८. | राज्य अभियान व्यवस्थापक - ज्ञान व्यवस्थापक (Knowledge Management) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ९. | अभियान व्यवस्थापक - प्रकाशन (Documentation) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १०. | अभियान व्यवस्थापक -संवाद (Communication) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ११. | संशोधक (Researcher) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १२. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ड) | **सामाजिक निरिक्षण कक्ष (Social Observatory Cell)** | | |
| १३. | राज्य अभियान व्यवस्थापक- सामाजिक निरिक्षण (Social Observatory) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १४. | अभियान व्यवस्थापक - संनियंत्रण व मुल्याकंन (Monitoring & Evaluation) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १५. | अभियान व्यवस्थापक - माहिती व्यवस्थपन प्रणाली (Management Information System) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १६. | संनियंत्रण व मुल्याकंन / माहिती व्यवस्थपन प्रणाली सहाय्यक | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| इ) | **माहिती, संवाद आणि तंत्रज्ञान कक्ष (Information Commutation Technology-ICT Cell)** | | |
| १७. | राज्य अभियान व्यवस्थापक (ICT) | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १८. | अभियान व्यवस्थापक - हार्डवेअर (Hardware) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १९. | अभियान व्यवस्थापक सॉफ्टवेअर (Software) | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २०. | माहिती आणि तंत्रज्ञान सहाय्यक | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| | **एकूण** | २३ | |
| **III)** | **सुलभकर्ता शाखा ( Support Unit)** | | |
| १. | युवा विकास व्यावसायिक (Young Development Professionals) | २० | कंत्राटी पध्दतीने |
| **IV)** | **प्रकल्प व्यवस्थापन शाखा (Project Management Unit)** | | |
| अ) | **प्रशासन कक्ष** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अवर सचिव | ०१ | प्रतिनियुक्तीने संदर्भिय शासन निर्णय ३ अन्वये |
| २. | कक्ष अधिकारी | ०१ | प्रतिनियुक्तीने संदर्भिय शासन निर्णय ३ अन्वये |
| ३. | सहाय्यक | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ४. | लिपिक | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ५. | रोखपाल | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ६. | शिपाई | ०४ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| **ब)** | **नियामक आणि उत्तरदायित्व कक्ष (Governance & Accountability Cell)** | | |
| १. | राज्य अभियान व्यवस्थापक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २. | सहाय्यक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| | **एकूण** | **१३** | |
| **V** | **लेखा व वित्त व्यवस्थापन शाखा (Account & Finance Management Unit)** | | |
| १. | उपसंचालक | ०१ | प्रतिनियुक्तीने संदर्भिय शासन निर्णय ३ अन्वये |
| २. | शिपाई | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| **अ)** | **लेखा कक्ष (Account Cell)** | | |
| ३. | वरिष्ठ लेखाधिकारी | ०१ | प्रतिनियुक्तीने संदर्भिय शासन निर्णय ३ अन्वये |
| ४. | लेखाधिकारी | ०२ | प्रतिनियुक्तीने संदर्भिय शासन निर्णय ३ अन्वये |
| ५. | सहाय्यक लेखाधिकारी | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ६. | लिपिक | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| **ब)** | **वित्त कक्ष (Finance Cell)** | | |
| ७. | वरिष्ठ लेखाधिकारी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ८. | लेखाधिकारी | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ९. | सहाय्यक लेखाधिकारी | ०२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| १० | लिपिक | ०१ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| | **एकूण** | **१४** | |
| | **राज्य मिशन व्यवस्थापन कक्षाची एकूण पदे** | **८४** | |
| | **एकूण युवा विकास व्यावसायिक (Young Devlopment Professional)** | **२०** | |
| | **एकूण पदे** | **१०४** | |

परिशिष्ट क्रमांक - ०३

(शासन निर्णय, क्रमांक : मजिअ-२०१३/प्र.क्र. १४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे सहपत्र.)

## जिल्हास्तर

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा अभियान संचालक (District Mission Director) | १० | संदर्भ शासन निर्णय १ अन्वये पदसिध्द स्वतंत्र वेतनाची गरज नाही |
| २. | जिल्हा अभियान सहसंचालक (District Mission Joint Director) | १० | संदर्भ शासन निर्णय १ अन्वये पदसिध्द स्वतंत्र वेतनाची गरज नाही |

## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष

| अ. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|---|
| १. | जिल्हा अभियान व्यवस्थापक (District Mission Manager) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| I) थिमॅटिक सहाय्य शाखा (Thematic Support Unit) | | | |
| २. | जिल्हा व्यवस्थापक - उपजीविका (कृषी) (District Manager -Livelihoods (Farm)) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ३. | जिल्हा व्यवस्थापक - उपजीविका (बिगर कृषी) (District Manager -Livelihoods (Non-Farm)) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ४. | जिल्हा व्यवस्थापक - रोजगार व कौशल्य विकास (District Manager - Job Placement & Skill Development ) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ५. | जिल्हा व्यवस्थापक - क्षमता बांधणी (District Manager -Capacity Building) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ६. | जिल्हा व्यवस्थापक - सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी (District Manager - Social Inclusion & Institution Building) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ७. | जिल्हा व्यवस्थापक - आर्थिक समावेशन (District Manager - Financial Inclusion) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ८. | जिल्हा व्यवस्थापक - माहिती व्यवस्थापन प्रणाली (District Manager – Management Information System-MIS) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ९. | जिल्हा व्यवस्थापक - संनियंत्रण व मुल्यांकन (District Manager- Monitoring & Evaluation) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| १०. | जिल्हा व्यवस्थपक - ज्ञान व्यवस्थापन (District Manager - Knowledge Management) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ११. | जिल्हा व्यवस्थापक - विपणन (District Manager -Marketing ) | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| | एकूण | ११० | |
| II) प्रशासन शाखा (Administration Unit) | | | |
| १२. | कार्यालयीन अधिक्षक तथा जिल्हा व्यवस्थापक - संपादणूक | १० | प्रतिनियुक्तीने/कंत्राटी पध्दतीने |
| १३. | प्रशासन सहाय्यक | १० | प्रतिनियुक्तीने/कंत्राटी पध्दतीने |
| १४. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| १५. | शिपाई | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| | एकूण | ४० | |
| III) लेखा शाखा (Account Unit) | | | |
| १६. | लेखाधिकारी | १० | प्रतिनियुक्तीने/कंत्राटी पध्दतीने |
| १७. | लेखापाल | १० | प्रतिनियुक्तीने/कंत्राटी पध्दतीने |
| १८. | वरिष्ठ सहाय्यक लेखा | १० | प्रतिनियुक्तीने/कंत्राटी पध्दतीने |
| १९. | लिपीक | १० | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| | एकूण | ४० | |
| | एकूण पदे | १९० | |

परिशिष्ट क्रमांक - ०४

(शासन निर्णय, क्रमांक : **मजिअ**-२०१३/प्र.क्र. १४३ /योजना-३, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई दिनांक : २१ मे २०१३ चे **सहपत्र**.)

## तालुकास्तर

### तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष

| अ. क्र. | पदाचे नाव | | पद संख्या | नियुक्तीचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| १. | तालुका अभियान व्यवस्थापक | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| **I) थिमॅटिक सहाय्य शाखा** (Thematic Support Unit) | | | | |
| २. | विस्तार अधिकारी तथा गट समन्वयक (Block Coordinator) | | ७२ | संदर्भिय शासन निर्णय २ अन्वये प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ३. | तालुका व्यवस्थापक - उपजीविका (Block Manager- Livelihoods) | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ४. | तालुका व्यवस्थापक - क्षमता बांधणी (Block Manager- Capacity Building) | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ५. | तालुका व्यवस्थापक आर्थिक समावेशन (District Manager - Financial Inclusion) | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ६. | सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी (Social Inclusion & Institution Building) | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ७. | तालुका व्यवस्थापक - माहिती व्यवस्थापन प्रणाली आणि संनियंत्रण व मुल्याकंन (Block Manager- Management Information System and Monitoring & Evaluation) | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| **II) प्रशासन व लेखा कक्ष** (Administration and Account Unit) | | | | |
| १. | प्रशासन सहाय्यक | | ७२ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| २. | लेखा सहाय्यक | | ३६ | प्रतिनियुक्तीने / कंत्राटी पध्दतीने |
| ३. | डेटा एन्ट्री ऑपरेटर | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| ४. | शिपाई | | ३६ | प्रतिनियुक्तीने/ कंत्राटी पध्दतीने |
| | | **एकूण पदे** | **४६८** | |
| **III) प्रभाग व गणस्तर** (Zilla Parishad and Panchayat Samiti Constituency level) | | | | |
| १. | क्लस्टर कोऑर्डीनेटर (Cluster Coordinator) | प्रती जिल्हा परिषद प्रभागस्तरावर एक क्लस्टर कोऑर्डीनेटर याप्रमाणे | | कंत्राटी पध्दतीने |
| २. | समुदाय संघटिका/संघटक Community Organiser | प्रती पंचायत समिती गणस्तरावर एक समुदाय संघटिका/संघटक याप्रमाणे | | कंत्राटी पध्दतीने |

------------